# देगलूर महाविद्यालयात विशेष लसीकरण मोहीम संपन्न

देगलूर- येथील देगलूर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने कोवीड -१९ लसीकरण मोहिम आरोग्य विभागाच्या सहयोगाने राबविण्यात आली.

लसीकरण शिबिरात एकुण ३१९ विद्यार्थ्यांनी कोव्हॅक्सीन लस घेतली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार, उपप्राचार्य एन. एम. गोविंदवार, पर्यवेक्षक संग्राम पाटील, गोविंद जोशी व रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.व्यंकट खंदकुरे, डॉ. सुरेश काशिंदे, प्रा विनोद काळे, प्रा हाणमंत वाकडे, प्रा एम. एम. चमकुडे, डॉ संतोष येरावार, राम दाचावार यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.